**<u>वाळू/रेती निर्गती धोरण-२०२५</u>**

**(१०% वाळू घरकुलांकरीता बंधनकारक)**

**महाराष्ट्र शासन**
**महसूल व वन विभाग**
**शासन निर्णय क्रमांक: गौखनि-१०/०१२५/प्र.क्र.०५/ख-१,**
**हुतात्मा राजगुरु चौक,**
**मादाम कामा मार्ग, मंत्रालय मुंबई-३२,**
**दिनांक : १५ मे, २०२६**

**<u>वाचा :-</u>**

१) महाराष्ट्र गौण खनिज उत्खनन (विकास व विनियमन) नियम, २०१३
२) शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांकः गौखनि-१०/०१२५/प्र.क्र.०५/ख-१, दि.०८.०४.२०२५

**<u>प्रस्तावना :-</u>**

वाळू/रेती निर्गती धोरण 2025 मधिल भाग-चार लिलावाद्वारे निर्गती (उ) लिलावाची प्रक्रीया (xxi) नदी/खाडी पात्रामधून वाळू निर्गतीकरीता पात्र लिलावधारक यांना त्यांनी उत्खनन केलेल्या वाळूच्या जास्तीत जास्त १०% वाळू प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकूलांकरीता विनामूल्य उपलब्ध करून देणे लिलावधारक यांना बंधनकारक राहील याबाबत तरतूद करण्यात आलेली आहे.

उपरोक्त नमुद तरतूदीनुसार सद्यस्थितीत उत्खननच्या केलेल्या वाळूच्या जास्तीत जास्त १०% वाळू प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकूलांकरीता विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहे. तथापी, नागपूर सह काही जिल्ह्यात घरकूल लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात असुन अशा सर्वच लाभार्थ्यांना घरकूलासाठी वाळू उपलब्धता व्हावी म्हणून शासन निर्णय दिनांक ०८.०४.२०२५ मधील उक्त तरतूदीनुसार उत्खननच्या १०% वाळूची तरतूद ऐवजी वाळूघाटामध्ये उपलब्ध एकुण वाळूसाठ्याचा १०% वाळू घरकूल लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्याबाबत तरतुदीचा समावेश केल्यास प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकूलांकरीता जास्तीत जास्त प्रमाणात वाळूची उपलब्धता करून देणे शक्य होईल.

सबब दिनांक ०८.०४.२०२५ च्या शासन निर्णयातील उत्खनन केलेल्या वाळूच्या जास्तीत जास्त १०% या तरतुदी ऐवजी वाळूघाटामध्ये उपलब्ध एकुण वाळूसाठ्याच्या १०% वाळू घरकूल लाभार्थ्यांना उपलब्ध करून देण्याबाबतच्या तरतुदीचा समावेश करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

**<u>शासन निर्णय :</u>**

प्रस्तावनेतील विवेचनाच्या पार्श्वभूमीवर, संदर्भाधिन क्र.२ येथील शासन निर्णय, महसूल व वन विभाग, क्रमांकः गौखनि-१०/०१२५/प्र.क्र.०५/ख-१, दि.०८.०४.२०२५ मधील भाग-चार 'लिलावाद्वारे निर्गती' या मधील अनुक्रमांक (उ) "लिलावाची प्रक्रिया" मधील (xxi) येथे नमूद असलेली तरतूद रद्द करण्यात येत असून आता त्याऐवजी खालीलप्रमाणे सुधारित तरतुदी अंतर्भूत करण्यात येत आहेतः

**<u>भाग -चार</u>**

**<u>लिलावाद्वारे निर्गती</u>**

**(उ) लिलावाची प्रक्रिया**

(xxi) नदी/खाडीपात्रामधून वाळू निर्गतीकरीता पात्र लिलावधारक यांनी **वाळूघाटामध्ये उपलब्ध एकुण वाळूसाठ्याच्या १०% वाळू** प्रधानमंत्री आवास योजनेंतर्गत तसेच आर्थिकदृष्ट्या मागास प्रवर्गातील लाभार्थ्यांच्या घरकुलांकरीता विनामूल्य उपलब्ध करुन देणे लिलावधारक यांना बंधनकारक राहील. त्याबाबत लिलावधारकास शासनामार्फत कोणतीही रक्कम अनुज्ञेय राहणार नाही याची

लिलावधारकाने नोंद घ्यावी व सदर बाब जिल्हाधिकारी यांनी लिलावासाठी निर्गमित करण्यात येणाऱ्या ई-लिलावाच्या जाहिरातीमध्ये ठळकपणे नमूद करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०२६०५१५१७११११८३१९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

RATHOD UMESH DHARMA

Digitally signed by RATHOD UMESH DHARMA
DN: c=IN, o=GOVERNMENT OF MAHARASHTRA, ou=Revenue and Forests Department,
2.5.4.20=FA30EEF6A9E239E9B4F8129A1B10556B20319BBEC898D94F4E0E028A365FCEC5, postalCode=400032, st=Maharashtra,
serialNumber=3667A98F6D3E5F0ED5652697D674C2EB05D852DD34F87FDA6A20696C80787981, cn=RATHOD UMESH DHARMA
Date: 2026.05.15 17:14:21 +05'30'

**(डॉ.उमेश ध.राठोड)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन**

**प्रत,**

१) मा. राज्यपाल यांचे प्रधान सचिव, राजभवन मलबार हिल, मुंबई.
२) मा.मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य यांचे अ.मु.स., मंत्रालय, मुंबई
३) मा.उप मुख्यमंत्री (नगरविकास) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
४) मा.उप मुख्यमंत्री (वित्त व नियोजन) यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
५) सर्व मा.मंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
६) मा.अध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई
७) मा.सभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
८) मा.उपाध्यक्ष, महाराष्ट्र विधानसभा, विधानभवन, मुंबई
९) मा.उपसभापती, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई.
१०) मा.विरोधी पक्षनेता, महाराष्ट्र विधानपरिषद, विधानभवन, मुंबई
११) सर्व मा.राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.
१२) सर्व मा.विधानसभा/विधानपरिषद सदस्य, विधानभवन, मुंबई.
१३) महालेखापाल-१, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), मुंबई.
१४) महालेखापाल-२, महाराष्ट्र राज्य (लेखा व अनुज्ञेयता), (लेखापरिक्षा), नागपूर.
१५) सर्व मंत्रालयीन विभाग.
१६) सर्व विभागीय आयुक्त.
१७) संचालक, भूविज्ञान व खनिकर्म संचालनालय, नागपूर.
१८) संचालक, भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
१९) प्रधान मुख्य वन संरक्षक, नागपूर.
२०) सर्व जिल्हाधिकारी.
२१) निवडनस्ती "ख कार्यासन.